REVIEW OF RESEARCH

# जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा , मार्कंडेय नगर येथील इ. पाचवीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील मुक्तोत्तरी प्रश्नांना प्रतिसाद देताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची परिणामकारकता तपासणे

मंजू विठ्ठल यादव

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



## १. प्रस्तावना :-

मुलांना वाचायला-लिहायला तर यावेच पण त्याच बरोबर त्यांना उत्तम बोलायला यावे, चांगले खेळायला यावे. त्यांनी सभोवतालच्या परिसरातील घटनांचे आणि वस्तूंचे निरीक्षण करून ज्ञान मिळवावे. हाताने विविध कामे करावीत, कलाकौशल्य शिकावित. विविध कलांचा आस्वाद घेण्यास शिकावे. त्यांचे व्यक्तिमत्व अनेकविध अंगानी बहरावे अशी अपेक्षा आहे. मुलांनी शिकता-शिकता आणि कृती करता-करता स्वतःचा शोध घेण्यास सुरूवात करावी. या शोधातून त्यांना स्वतः मधील निसर्गदत्त शक्तिस्थळे गवसावित आणि मग प्रत्येक मुलाने आवडीच्या क्षेत्रात उत्तुंग झेप घ्यावी अशा हेतूने मूल्यमापन पध्दती लागू केली आहे.

शैक्षणिक मूल्यमापन प्रक्रिया ही अध्ययन-अध्यापनावर, शिक्षण प्रक्रियेच्या दर्जावर आणि परिणामी एकंदर शैक्षणिक व्यवस्थेवर सुध्दा परिणाम करत असते, त्यामुळे शाळा शिक्षक, विद्यार्थी-पालक, विविध समाजघटक मूल्यमापन पध्दतीबाबत अत्यंत संवेदनशील असतात. शैक्षणिक मूल्यमापन पध्दती नजरेसमोर ठेवून सर्व शैक्षणिक प्रक्रियेचे नियोजन व कार्यवाही होते, शैक्षणिक मूल्यमापन प्रक्रियेत उणिवा, त्रुटी अथवा दोष राहिल्यास ते एकंदर शैक्षणिक गुणवत्ता विकासातील अडथळे ठरतात. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवरील विविध आयोगांचे अहवाल, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे, कृती कार्यक्रम आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडे यामध्ये मूल्यमापन अथवा परीक्षा पध्दतीच्या सुधारणांबाबत प्रकर्षाने विचारमंथन केलेले दिसून येते.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विविध अंगानी विकसित होत असताना निरीक्षणातून विद्यार्थ्यांचे शिकण्यासाठी धडपडणे , बोलणे , विचार व्यक्त करणे , त्याचे लिहिणे, त्याने दाखवलेले कल्पनाचातुर्य त्याचे चिकित्सक तसेच सर्जनशील विचार करणे या सर्व बाबींचा पडताळा सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीने घेता येतो. शिक्षकांनी दैनंदिन अध्ययन अध्यापनात अध्ययन अनुभव देत असताना आकारिक मूल्यमापन नकळत घडते. मूल्यांची रूजवणूक व जीवन कौशल्यांचा विकासही सहज साधता यावा या हेतूने सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीत आकारिक मूल्यमापनाचा समावेश करण्यात आला.केंद्र शासनाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिकार अधिनियम २००९ दिनांक १ एप्रिल २०१० पासून लागू केला. त्यानुसार इयत्ता आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना कोणत्याही बोर्डाची परीक्षा द्यावी लागणार नाही. सदर अधिनियमामधील कलम २९ (१) नुसार सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते आठवीसाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती महाराष्ट्र शासनाने लागू केली .

## २. संशोधन समस्येचे शीर्षक :-

**जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा , मार्कंडेय नगर येथील इ. पाचवीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील मुक्तोत्तरी प्रश्नांना प्रतिसाद देताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची परिणामकारकता तपासणे**

## ३. उद्दिष्टे :-

१. इयत्ता पाचवीच्या इंग्रजी विषयातील मुक्तोत्तरी प्रश्नांना प्रतिसाद देताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
२. त्या अडचणी दूर करण्यासाठी कृतीकार्यक्रम विकसित करणे.
३. विकसित केलेल्या कृतीकार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

## ४. शून्य परिकल्पना :

इंग्रजी विषयाच्या मुक्तोत्तरी प्रश्नांना प्रतिसाद देताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विकसित केलेल्या उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर कोणताच परिणाम होणार नाही.

## ५. संशोधन पद्धती :

वरील तीन पद्धतीपैंकी प्रस्तुत संशोधन हे संशोधन समस्या ही भविष्य काळाशी निगडीत असल्यामुळे संशोधकाने प्रायोगिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

## ६. संशोधन साहित्याची निवड :

संशोधकाने संशोधकनिर्मित लेखी चाचणी या साधनाची निवड केलेली आहे.

## ७. संशोधनासाठी नमुना निवड :-

प्रस्तुत संशोधनासाठी सहेतूक नमुना निवड पध्दती वापरली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टिकेकरवाडी या शाळेतील विद्यार्थ्यांची चाचणी घेतली. त्यानंतर ज्या विद्यार्थ्यांना मुक्तोत्तरी प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत अशा १५ विद्यार्थ्यांची निवड नमुना निवड म्हणून केलेली आहे.

## ८. इंग्रजी विषयातील मुक्तोत्तरी स्वरूपाच्या प्रश्नांसाठी राबवलेले उपक्रम :

**A) Make meaningful phrases using the letters given in the boxes.**
**B) Read A garden of words and answer the questions.**
**C) Make new word changing the first letters of the given word below.**
**D) Make meaningful phrases using the each letter of the given word below.**
**E) Change the sentences**

## G) सर्जनशील , चिकित्सक विचारांना चालना देणाऱ्या स्वाध्यायांचा सराव :

विद्यार्थी या प्रकारच्या प्रश्नांना प्रतिसाद न देण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे या स्वरूपाच्या प्रश्नांची उत्तरे लिहून घेण्याच्या स्वाध्यायांचा अभाव. यांचा विचार करून सर्जनशील, चिकित्सक विचारांना चालना देणाऱ्या स्वाध्यायांचा सराव करून घेतला.

अशाप्रकारे उपक्रम राबवून संशोधकाने उत्तर चाचणी घेतली.

## ९. निष्कर्ष :

प्राप्त t - (३.९८) ०.०५ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा (df = १४) करिता सारणीतील निर्धारित t - मूल्यापेक्षा (२.४७) जास्त आहे. म्हणून प्राप्त t - मूल्य ०.०५ सार्थकता स्तरावर अधिक (लक्षणीय) आहे. इंग्रजी विषयाच्या मुक्तोत्तरी प्रश्नांना प्रतिसाद देताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विकसित केलेल्या उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर कोणताच परिणाम होणार नाही. या शून्य परिकल्पनेचा त्याग करून इंग्रजी विषयाच्या मुक्तोत्तरी प्रश्नांना प्रतिसाद देताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विकसित केलेल्या उपक्रमांमुळे मध्यमान गुणांकात फरक पडतो ही परिकल्पना स्वीकारावी लागेल. याचा अर्थ असा की इंग्रजी विषयाच्या मुक्तोत्तरी प्रश्नांना प्रतिसाद देताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विकसित केलेल्या उपक्रमांमुळे मध्यमान गुणांकात पडलेला फरक (१.५१ गुणांकांचा) खरा आहे, तो केवळ योगायोगाचा परिणाम नाही. सारांश , इंग्रजी विषयाच्या मुक्तोत्तरी प्रश्नांना प्रतिसाद देताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विकसित केलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची संपादणूक वाढते.

## १०. शिफारशी :

१. इंग्रजी विषयाच्या मुक्तोत्तरी प्रश्नांचा अधिक सराव घ्यावा.
२. इंग्रजी विषयाच्या मुक्तोत्तरी प्रश्नांच्या सरावासाठी नाविन्यपूर्ण उपक्रमांची निर्मिती शिक्षकांनी करावी.
३. इंग्रजी विषयाच्या मुक्तोत्तरी प्रश्नांचा सराव घेताना शिक्षकांनी सर्जनशील प्रश्नांची योजना करावी.
४. शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अधिकाधिक प्रमाणात करावा.
५. पुस्तकासह चाचणी घेताना शिक्षकांनी वेगवेगळ्या प्रकारच्या साहित्याचा वापर करावा.

## संदर्भग्रंथ सूची


१. अब्दुल सलाम चाऊस (२००९) : शब्दांवर प्रभूत्व मिळवा प्रथम आवृत्ती , नागपूर : अल्टीमेट पब्लिकेशन .
२. भिंताडे वि. रा. (१९८९) : शैक्षणिक संशोधन पद्धती प्रथम आवृत्ती , पुणे : नुतन प्रकाशन .
**3. Gurav, H.K. (1991)** "Teaching aspects of English language," Nutan Publication, Solapur.
**4.** Lunzer, E., & Gardner, K. (Eds.). (1979). The effective use of reading. London: Heinemann Educational.
**5.** Munby, J. (1978). Communicative syllabus design. Cambridge: Cambridge University Press.
**6.** Urquhart, A. H., & Weir, C. J. (1998). Reading in a second language: Process, product, and practice. London and New York: Longman.
7. Teaching of English : P. K. Gupta, Anil Gandhi & S.S. Bhatnagar 1994.
8. Teaching of English – A Modern Approach, Bose F. L. 1998




LBP PUBLICATION